डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत ता. राळेगांव, ता. केळापूर मधील संवेदनशील १० गावांची निवड.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्र. बैठक-०११८/प्र.क्र.१०/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २८.०२.२०१८

वाचाः- १) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक -एफडीएम-२०१२/प्र क्र ४/फ-२, दिनांक १०/०७/२०१२
२) शासन निर्णय,महसुल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी-०५१५/प्र.क्र.१५५/फ-१ दिनांक ४/८/२०१५.
३) शासन निर्णय,महसुल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी-०४१७/प्र.क्र.१२७/फ-१ दिनांक २१/९/२०१७.
४) शासन आदेश ,महसुल व वन विभाग, क्रमांक- बैठक-०११८/प्र.क्र.१०/फ-१ दिनांक ०९/०१/२०१८

प्रस्तावना-:

वनालगतच्या गावांमध्ये तेथील जन-जल-जंगल-जमीन या संसाधनांचा शाश्वत विकास साधून उत्पादकता वाढविणे, गावक-यांची वनावरील निर्भरता कमी करणे, शेतीला पूरक जोडधंदे निर्मिती करणे, पर्यायी रोजगार उपलब्ध करून देणे यातून मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करणे व अशा त-हेने गावक-यांच्या सहभागातून वन-वन्यजीवांचे संरक्षण व व्यवस्थापनाचा दर्जा उंचावून गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने राज्यामध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजना संदर्भीय शासन निर्णयान्वये राबविण्यात येते. यवतमाळ जिल्हयातील ता.राळेगाव व ता. केळापूर क्षेत्रामध्ये मानव वन्यप्राणी संघर्षाच्या घटना सतत घडत आहेत. या पार्श्वभूमीवरुन स्थानिकांचे वनावरील अवलंबन कमी होऊन मानव वन्यप्राणी संघर्षाच्या घटनांना आळा बसण्याच्या अनुषंगाने ता. राळेगाव व ता. केळापूर मध्ये मानव वन्यप्राणी संघर्ष असलेल्या संवेदनशील १० गावांचा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत विशेष बाब म्हणून समावेश करण्यात येत आहे.

शासन आदेश:-

सन २०१७-१८ करीता डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत निवडलेल्या ता. राळेगाव व ता. केळापूर मधील मानव वन्यप्राणी संघर्षाच्या अनुषंगाने संवेदनशील असलेल्या खालील १० गावांना शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	गावांची नावे	अ.क्र	गावांची नावे
१	बोराटी, ता. राळेगांव	६	सखी, ता. राळेगाव
२	खैरगाव कासार, ता. राळेगाव	७	अडणी, ता. राळेगाव
३	झोटींगधरा, ता. केळापूर	८	जीरा, ता. केळापूर
४	तेजनी, ता. राळेगाव	९	लोणी, ता. राळेगांव
५	सराटी, ता. राळेगाव	१०	मीरा, ता. केळापूर

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२८१३२३११५११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने.

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.02.28 13:24:36 +05'30'

(स्वप्नील देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रत:-

१. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास),नागपूर.
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ.
८. उप वनसंरक्षक (प्रादेशिक), पांढरकवडा.
९. कार्यासन फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (निवडनस्ती)